**"जून २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक २४ जून २०२० च्या शासन निर्णयान्वये श्री.अजोय मेहता, भा.प्र.से. (१९८४) यांची सेवानिवृत्तीनंतर मुख्यमंत्री कार्यालयात प्रधान सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जून २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.७०.९४ लाख तसेच ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) उद्दिष्टाखाली रु.६८६.०७ लाख अशी एकूण रु.७५७.०१ लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी आता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली माहे जून २०२० करिता रु.१०.६४१ लाख इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.
- दिनांक २६ जून २०२० च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या ८ अस्थायी पदांना दिनांक १ मार्च २०२० ते ३१ ऑगस्ट २०२० या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक २६ जून २०२० च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनासाठी एप्रिल ते जून २०२० या तीन महिन्यांकरिता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.१२.५० लाख (पहिला हप्ता) इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.
- दिनांक २६ जून २०२० च्या शासन निर्णयान्वये यशदा, पुणे व राज्य प्रशिक्षण धोरणामध्ये ६ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या प्रशिक्षकांना निश्चित केलेल्या दराने प्रशिक्षण भत्ता दिनांक १ जानेवारी २०१९ पासून मंजूर करण्यात आला आहे.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील १२ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका अवर सचिवाला प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.

****